# बृहन्मुंबई महानगरपालिका

**क्र.सआबी/ /अनु. (अति. निर्मूलन) / दि.**

## जाहिर सूचना

विषय:- 'बी' विभागाकरिता अनधिकृत फेरीवाल्यांवर कारवाई करण्याकरिता अशासकीय संस्था मार्फत 8 स्वयंसेवक पुरवठा करण्यासंबंधी जाहिर सूचना...................…

सदर सुचनेद्वारे नोंदणीकृत सर्व अशासकीय संस्थांना कळविण्यात येते की, 'बी' विभागातील अनधिकृत फेरीवाल्यांवर कारवाई करण्याकरिता खालील अटींनुसार स्वयंसेवक भाडे तत्त्वावर घेण्याबाबत इच्छुक अशासकीय संस्था सहाय्यक आयुक्त 'बी' विभाग, कार्यालय इमारत, 121, रामचंद्र भट्ट मार्ग, बाबूला टँक क्रॉस लेन, मुंबई-400009 यांचे नावे नोंदणी प्रमाणपत्रे व अनुभव इत्यादि आवश्यक कागदपत्रांसहित दिनांक 15.07.2021रोजी दुपारी 3.00 वाजेपर्यंत अर्ज अनुज्ञापन खाते, खोली क्र. 19, 'बी' विभाग कार्यालय इमारत, 121, रामचंद्र भट्ट मार्ग, बाबूला टँक क्रॉस लेन, मुंबई – 400009 येथे सीलबंद पेटीत टाकावे.

अशासकीय संस्था यांनी अर्जासोबत खालील कागदपत्रांची पूर्तता करणे आवश्यक आहे.

1. सदर कामासाठी अशासकीय संस्थांनी अर्ज करावेत (बी' विभागात काम केलेल्या अशासकीय संस्थांना प्राधान्य देण्यात येईल). ज्या संस्था काळ्या यादीत आहेत किंवा ज्या संस्थांचे काम बृहन्मुंबई महानगरपालिकेने समाधानकारक नाही म्हणून काढून टाकले आहे त्या संस्थेने या कामासाठी अर्ज करू नये, अशा संस्थांना अपात्र ठरविण्यात येईल.
2. कार्यादेशाच्या दिनांकापासून पाच महिन्याच्या कालावधीकरीता (साप्ताहिक सुट्टी व सार्वजनिक सुट्टी वगळता) आवश्यकतेनुसार स्वयंकसेवक पुरविणे.
3. रु. 644.23/- (46% लेव्ही विरहीत) प्रतिदिन प्रति स्वयंसेवक इतके वेतन परिपत्रक क्र.प्रकाअ/01, 2020-2021, दि. 15.04.2020 मधील अटींच्या पूर्ततेनंतर (प्रतिपूर्ती स्वरुपात) देण्यात येईल.
4. यशस्वी संस्थांनी एकूण कार्यादेश रक्कमेच्या 5% एवढी अनामत रक्कम भरणे आवश्यक आहे.
5. 'बी' विभागातील अधिका-यांच्या सूचनेनुसार रोजच्या कामाकरिता मागणी केलेल्या (प्रथम सत्र व द्वितीय सत्र) सुरळीतपणे, विनाविलंब, सक्षम स्वयंकसेवकांचा पुरवठा करणे.
6. पुरवठा केलेल्या स्वयंकसेवकांच्या बिलाची रक्कम बृहन्मुंबई महानगरपालिका नियमांनुसार आवश्यक पडताळणी व लेखा परिक्षणानंतर संबंधित संस्थेला ई.सी.एस. /एन.ई.एफ.टी. द्वारे पुढील महिन्याच्या 15 तारखेनंतर अधिदान दिले जाईल.
7. बाल स्वयंकसेवकांना पुरवठा करणे निषिद्ध आहे व तसे केल्यास त्याची संपूर्ण कायदेशीर जबाबदारी संबंधित अशासकीय संस्था यांचीच राहिल.
8. अशासकीय संस्था यांनी नोंदणी प्रमाणपत्र, बँक खात्याचा तपशील, मागील वर्षाचा ताळेबंद अहवाल व कामाच्या अनुभवाचे प्रमाणपत्र अर्जासोबत जोडावे.
9. स्वयंसेवक कमी पुरविल्यास किंवा कामाच्या ठिकाणी हजर नसल्यास, रु. 200/- प्रति स्वयंसेवक प्रति दिन दंड आकारण्यात येईल.
10. वरील अटींचे पालन न करणा-या व समाधानकारकरीत्या काम न करणा-या अशासकीय संस्था यांचेकडून स्वयंकसेवक पुरवठा करणायचे काम त्वरित थांबविण्याचे अधिकार सहाय्यक आयुक्त 'बी' विभाग यांना राहतील.
11. अशासकीय संस्था यांचेकडून विहित मुदतीत प्राप्त झालेल्या अर्जाची छाननी करून लॉटरी पदधतीने पात्र अशासकीय संस्था यांची निवड करण्यात येईल.

वरील निकषामध्ये न बसणा-या संस्थांना कोणतेही कारण न देता अपात्र ठरविण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

लॉटरीची तारीख दि. 16.07.2021 रोजी दुपारी 3.00 वाजता निश्चित करण्यात आलेली आहे.

सही/-

**सहाय्यक आयुक्त 'बी' विभाग**